एसटीची पर्यायी व्यवस्था : यापूर्वी झाली ९५ चालकांची भरती

# जिल्ह्यात आणखी दीडशे कंत्राटी चालकांची भरती होणार!

सचिन देव
लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बसेस जागेवरच उभ्या असल्याने महामंडळाने बससेवा सुरळीत करण्यासाठी सुरुवातीला ९५ चालकांची भरती केली. यामुळे काही प्रमाणात बसेस रस्त्यावर आल्या. तर आता पुन्हा जळगाव विभागात दीडशे कंत्राटी चालकांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती झाल्यानंतर महामंडळातर्फे ग्रामीण भागातीलही सेवा सुरू करण्याचे नियोजन असून, यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विलिनीकरणाच्या मागणीसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी ७ नोव्हेंबर पासून संप पुकारला आहे. या संपाला पाच महिने उलटले असून, अद्यापही ५० टक्के कर्मचारी संपात आहेत. त्यामुळे ५० टक्के बस सेवाही बंद असून, यामध्ये ग्रामीण भागातील सेवा पूर्णतः बंद आहेत. यामुळे शहरात येणाऱ्या नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. त्यामुळे महामंडळातर्फे बससेवा पूर्ववत करण्यासाठी सुद्धा पातळीवर प्रयत्न सुरू असून गेल्या महिन्यात ९५ चालकांची कंत्राटी पद्धतीवर भरण्यात आली होती. यामुळे काही प्रमाणात विविध आगारातून बसेस सोडण्यात येत असल्या तरी ... पुन्हा १५० कंत्राटी चालकांची भरती प्रक्रिया महामंडळातर्फे लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## या आधी झाली ९५ चालकांची भरती



महामंडळातर्फे एका खासगी एजन्सीमार्फत राज्यभरात गेल्या महिन्यात कंत्राटी चालकांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यात जळगाव विभागात ९५ चालकांची भरती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना सुरुवातीला एका महिन्याची नियुक्ती देण्यात येत असून, त्यानंतर महामंडळाच्या सूचनेनुसार नियुक्तीचा कालावधी वाढविण्यात येत आहे.

## आणखी १५० कंत्राटी चालक घेणार



संपातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी आवाहन करूनही, हे कर्मचारी अद्यापही कामावर रुजू होत नसून, आपल्या मागणीवर ठाम आहेत. त्यामुळे महामंडळाने बससेवा पूर्ववत करण्यासाठी आणखी १५० कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे.

## निम्म्या बसेस आगारातच

गेल्या पाच महिन्यांत आतापर्यंत ५० टक्के बससेवा सुरू झाली आहे. विविध शहरी मार्गावर बसेस सोडण्यात येत असल्याने, प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, संपातील उर्वरित कर्मचाऱ्यांअभावी निम्म्या बसेस आगारातच उभ्या आहेत. त्या सुरळीत सुरू होण्याची अपेक्षा आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी बससेवा पूर्ववत करण्याकरिता या आधी ९५ कंत्राटी चालकांची भरती करण्यात आल्यानंतर, आता पुन्हा १५० चालकांची भरती करण्याची परवानगी मिळाली आहे. ही भरती प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

- भगवान जगनोर,
विभाग नियंत्रक

## ५० टक्के कर्मचारी अजूनही संपात

एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाला पाच महिने पूर्ण झाले आहेत. वेळोवेळी आवाहन केल्यानंतर, आतापर्यंत ५० टक्के कर्मचारी कामावर रुजू झाले असून, ५० टक्के कर्मचारी अजूनही संपात आहेत. ५० टक्के कर्मचारी सध्या कामावर येत असल्यामुळे, महामंडळातर्फे दिवसभरात ७०० फेऱ्या होत आहेत.